<u>**वर्धापन दिन प्रेस नोट**</u> **दि.०१/०५/२०१८**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या **अठ्ठावन्नाव्या** वर्धापन दिनोत्सवानिमित्त मंगळवार,दि.१ मे २०१८ रोजी सकाळी ०८/०० वा.**मा.ना.श्री.गिरीश बापट,अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन,ससंदीय कार्यमंत्री तथा पालक मंत्री,पुणे जिल्हा** यांचे शुभहस्ते पोलीस संचलन मैदान शिवाजीनगर,पुणे येथे <u>**ध्वजारोहण समारंभाचा**</u> कार्यक्रम संपन्न झाला. राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभास मा.रश्मि शुक्ला,पोलीस आयुक्त,पुणे शहर, मा.रविंद्र कदम,सह पोलीस आयुक्त,पुणे शहर, मा.प्रदिप देशपांडे,अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे, मा.तेजस्विनी सातपुते,जिल्हा समादेशक,होमगार्ड व पुणे पोलीस आयुक्तालयातील तसेच परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त दर्जाचे अधिकारी उपस्थित होते. सदर वेळी पुणे शहर व परिसरातील इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच शासकीय, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी हजर होते.

सकाळी ०८/०० वा. मत्री महोदय यांचे आगमन व स्वागत झाले. प्रमुख पाहुणे म्हणुन **मा.श्री.नवल किशोर राम,(भा.प्र.से),जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,पुणे, मा.श्री.अनिल कवडे,प्रभारी विभागीय आयुक्त,पुणे** यांचे उपस्थितीत ध्वजारोहण करून,पालक मंत्री महोदयांकडुन पोलीस दल,गृहरक्षक दल या संचलन पथकाची पाहणी केली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी पुणे जिल्यातील पुणे शहर, सीआयडी, एसआरपीएफ, पुणे ग्रामीण, महसुल व शिक्षण इत्यादीं विभागांना शासन पुरस्कृत मिळालेले सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्रक प्रदान करून त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

संचलन पथक प्रमुख सौरभ अग्रवाल,सहा.पोलीस अधिक्षक,पुणे ग्रामीण,पुणे, उपसंचलन प्रमुख निलेश मोरे, सहा.पोलीस आयुक्त,अर्थिक व सायबर,पुणे शहर यांनी केले. पथसंचलना मध्ये एकुण **११** प्लाटुन होते. त्यामध्ये पुणे शहर,पुणे ग्रामीण, एसआरपीएफ, रेल्वे,वाहतुक, होमगार्ड, वाद्यवृंद इत्यादी **२४** अधिकारी व **४३०** जवानांनी भाग घेतला होता. तसेच वाहतुक शाखेकडील मोटार सायकल रायडर, श्वान पथक, जलद प्रतिसाद पथक, हेल्पलाईन १०९० महिलांचे मदतीकरीता वाहन, दंगल नियंत्रण वाहन, मोबाईल कंट्रोल रूम व्हॅन, वरूण वॉटर कॅनन वाहन, अग्निशमन वाहन, आरोग्य विभागाचे चित्ररथ, दोन ॲम्ब्युलन्स, मनपा पुणे यांचे चित्ररथ व जलयुक्त शिवार अभियान चित्ररथ यांनी भाग घेतला होता.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन सेवानिवृत्त श्रीमती.सुचित्रा तबीब, वरिष्ठ लेखनिक,पुणे ग्रामीण व सहा.फौज.एस. बी.नरके,(एसआरपीएफ),बल गट क्र.२,पुणे, संज्ञा कुलकर्णी, सविता जेरे यांनी केले. मंत्री महोदय यांनी उपस्थित पदाधिकारी व अधिकारी तसेच सन्माननीय नागरीकांना औपचारीक अभिवादन करून महाराष्ट्र दिन सोहळा साजरा केला.

<u>**सोबत**</u>:- कार्यक्रमाचे फोटो तसेच मा.पोलीस महासंचालक सो. यांचे प्रशंसनीय सेवेसाठी सन्मानचिन्ह पदक सन २०१७-१८ करीता प्राप्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे नावाची यादि crimepress.pune@gov.in या ई-मेल आयडी व https://punepolice.co.in या वेबसाईटवर पाठविली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,(प्रशासन)**
**तथा**
**जनसंपर्क अधिकारी,गुन्हे शाखा,पुणे**